मराठी विभाग

२०२३ – २०२४

# Courses Outcomes

महाविद्यालयातील अध्ययन, अध्यापन, संशोधन, संशोधन विस्तार, प्रशासकीय कामकाज इ. बाबत अचूक व अग्रेसर विभाग म्हणून मराठी विभागाची विशेष ख्याती आहे. महाविद्यालयात इतर विभागांना प्रेरणादायी, दिशादर्शक, स्फूर्तीदायी ठरेल असे मराठी विभागाचे कामकाज आहे. मराठीतील विविध साहित्यप्रकारातील साहित्यकृतींचा स्वतंत्रपणे पदवीस्तरावर अभ्यास केला जातो. पदवीस्तरावर साहित्यकृतींचा अभ्यास,साहित्य विचार व समीक्षा, भाषाविज्ञान, मध्ययुगीन मराठी साहित्याचा अभ्यास केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना साहित्याच्या अभ्यासातून मानवी मूल्यांची नेमकी जाण होण्यास हा अभ्यास कारणीभूत ठरतो आहे. साहित्यविचार, भाषाविज्ञानाच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांच्या साहित्य विषयक व भाषा विषयक जाणीवा प्रगल्भ होण्यास मदत झाली आहे. पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासातही भाषा व्यवहार आणि भाषिक कौशल्ये, मराठी साहित्याचा इतिहास, ऐतिहासिक आणि सामाजिक भाषाविज्ञान, ग्रामीण व दलित साहित्य, प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये, साहित्य समीक्षा व साहित्य संशोधन, नेमलेल्या अर्वाचीन साहित्यकृतीचा अभ्यास अभ्यास, लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य इ. च्या अभ्यासामुळे मराठी विषय घेतलेला विद्यार्थी समाजाभिमुख, रोजगाराभिमुख बनला आहे. पदवी व पदव्युत्तर स्तरावर मराठी विषयाचा सखोल, विश्लेषणात्मक, चिकित्सक अभ्यास करण्याची प्रेरणा, बळ, आत्मविश्वास विभागातील विद्यार्थ्यांना विषय शिक्षक व विभागप्रमुखाकडून मिळत असल्यामुळे नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची या विभागाची थोर परंपरा आहे. या परंपरेचा भाग म्हणून या वर्षात विभागाचे ०९ माजी विद्यार्थी नेट,सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. या विभागात अध्ययन करून नोकरी व रोजगाराच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण सरासरी २५ टक्के इतके आहे.

---